प्रकरण : सातवे

# उपसंहार

प्रकरण : सातवे

# उपसंहार

प्रकरण : सातवे

# उपसंहार

'लोकसखा ज्ञानेश्वर : एक अभ्यास'या संशोधन विषयाअंतर्गत आतापर्यंतच्या एकूण सहा प्रकरणांमध्ये आपण सविस्तर अभ्यास केला. 'आनंद यादव : वाङ्.मयीन जडणघडण'या पहिल्या प्रकरणात आनंद यादव यांचा जन्म, बालपण, शिक्षण, संस्कार, वाचन, लेखन, नोकरी, त्यांच्या साहित्यास मिळालेले पुरस्कार व त्यांनी हाताळलेल्या सर्व वाङ्.मयप्रकारांचा स्थूल आढावा घेतलेला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात अनेक नवे वाङ्.मयीन प्रवाह उदयास आले. त्यातील एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे ग्रामीण साहित्य हा होय. या प्रवाहाला समृद्ध करण्यासाठी अनेक ग्रामीण लेखकांनी हातभार लावला. त्याचप्रमाणे आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्यात फार मोलाची भर घातली आहे. त्यांनी कविता, कथा, कादंबरी, समीक्षा, चरित्रात्मक कादंबरी इत्यादी वाङ्.मयप्रकार हाताळले आहेत म्हणूनच त्यांचे हे कार्य उल्लेखनिय स्वरूपाचे आहे. तसेच त्यांनी स्वतःच्या वाङ्.मयीन कर्तृत्वाने मराठी साहित्यात आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे.

'मराठी चरित्रात्मक कादंबरी : स्थूल आढावा' या दुसऱ्या प्रकरणात मराठी कादंबरीचा उदय, कादंबरीची व्याख्या, तिचे घटक, मराठी कादंबरीतील नवनवे प्रवाह, मराठी चरित्रात्मक कादंबरीचा उदय, ऐतिहासिक चरित्रात्मक कादंबरी, संतचरित्रात्मक कादंबरी इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

कथा, कविता, नाटक इत्यादी वाङ्.मयप्रकाराप्रमाणेच कादंबरी हा वाङ्.मयप्रकार उदयास आला आहे. 'कादंबरी' या वाङ्.मयाची अनेक साहित्यिकांनी वेगवेगळ्या व्याख्या करण्याचा अनेक साहित्यिकांनी वेगवेगळ्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. कादंबरीची परिपूर्ण अशी व्याख्या सांगता येत नसली तरी तिचे घटक मात्र सर्व कादंबरीत आढळून येतात. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कादंबरीच्या क्षेत्रात ऐतिहासिक, राजकीय, ग्रामीण, सामाजिक, पौराणिक, चरित्रात्मक, संतचरित्रात्मक इत्यादी नवे

कादंबरीचे प्रवाह उदयास आले. हे सर्व कादंबरीचे प्रकार मानवाच्या ज्ञानात व अनुभवांच्या कक्षेमध्ये झालेल्या प्रगतीमुळे निर्माण झाले आहेत.

मराठी चरित्रात्मक कादंबरी हा प्रवाह खऱ्या अर्थाने विसाव्या शतकात उदयास आला. चरित्रात्मक कादंबरी ही सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात महान कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या जीवनावर लिहिली जाते. त्यामुळे हा कादंबरीचा प्रकार वास्तववादी असतो. तसेच कादंबरी हा वाङ्.मयप्रकार व्यक्तित्वप्रधान असल्याने लेखकाला एकाचवेळी संशोधन व सृजन यांचा विचार करून चरित्रात्मक कादंबरीचे लेखन करावे लागते. मराठी चरित्रात्मक कादंबरीचे पौराणिक, ऐतिहासिक, संतचरित्रपर इत्यादी प्रकार निर्माण झालेले आहेत. आतापर्यंत मराठीत अनेक चरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या असून मराठीतील पहिली चरित्रात्मक कादंबरी म्हणून 'हरिनारायण' या भीमराव कुलकर्णी यांच्या कादंबरीचा उल्लेख केला जातो. पण खऱ्या अर्थाने श्री.ज. जोशी यांची 'आनंदी गोपाळ' ही चरित्रात्मक कादंबरी मराठी वाङ्.मयात प्रतिष्ठित मानली जाते. तसेच या कादंबरीनंतर मराठी वाङ्.मयात अनेक चरित्रपर कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

संतचरित्रपर कादंबरी हा चरित्रात्मक कादंबरीचा एक प्रकार अस्तित्वात आला असून या कादंबरीचे संत हेच नायक असतात. तसेच मध्ययुगीन काळातील अनेक संतावर चरित्रात्मक कादंबऱ्या अलीकडे प्रकाशित झालेल्या आहेत. 'भगवान गौतमा' ही मराठीतील पहिली संतचरित्रात्मक कादंबरी आहे. तसेच ज्ञानदेव, तुकाराम, नामदेव, एकनाथ, जनाबाई, मुक्ताई इत्यादी संताच्या जीवनचरित्रावर कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. या सर्व कादंबऱ्यांचा स्थूल आढावा सदर प्रकरणात घेतला आहे.

'लोकसखा ज्ञानेश्वर : आशयसूत्र' या तिसऱ्या प्रकरणात सदर कादंबरीमधील आशयसूत्राचा अभ्यास केला. ज्ञानदेवांनी भावार्थ दीपिका, अनुभवामृत, चांगदेव पासष्टी व अभंगवाणी माधून सर्वसामान्य जनतेला जे तत्त्वज्ञान सांगितले ते तत्त्वज्ञान लेखकाने सदर कादंबरीत चित्रित केले आहे. ज्ञानेश्वरांनी नेवासे येथील धर्मशाळेत दीड वर्षे मुक्काम करून श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली गीता त्यांनी मराठी भाषेत नेवासीच्या पंचक्रोशीतील लोकांना सांगितली. ज्ञानदेवांनी या ग्रंथाच्या एकूण अठरा अध्यायाचे निरूपण तेथील

लोकांना दीड वर्षे सांगितले. शेवटी या ग्रंथाचा समाप्ती सोहळा साजरा केला आणि त्यांनी श्रोत्यांना पसायदान सांगितले. तसेच त्यांनी सर्व श्रोत्यांचे व गुरूंचे आभार मानले. त्यानंतर ज्ञानदेवांनी पुढे काही दिवसांनी भावर्थदीपिका व अमृतानुभव या ग्रंथांचे निरूपण आळंदीच्या पंचक्रोशीतील लोकांना सांगितले. तसेच त्यांनी या ग्रंथांचा वारकरी संप्रदायाशी असलेला संबंधही पंढरपूर येथील प्रवचनात श्रोत्यांना सांगितला. त्यांनी तळागाळातील समाजाला साधा-सोपा भक्तिमार्ग दाखविला. तसेच त्यांनी अनेक जाती-जमातीच्या लोकांना एकत्र केले आणि वारकरी संप्रदायाचा पाया घालून फार मोठी क्रांती केली.

ज्ञानदेवांनी तत्कालीन समाजातील लोकांना भ्रामक धर्माचारांच्या जुलुमातून मुक्त केले. तसेच त्यांनी समाजाला ग्रंथामधून चिद्विलासवादी तत्त्वज्ञान सांगितले आणि समाजातील सर्वसामान्य लोकांना धार्मिक मंत्रतंत्र व कर्मकांड यातून बाहेर काढून त्यांनी परमेश्वर प्राप्तीचा साधा-सोपा मार्ग दाखविला. त्यांचे मराठी भाषेवर प्रेम असून त्यांना या भाषेचा अभिमानही होता. म्हणून त्यांनी भगवद्‌गीतेवरील महाभाष्य मराठी भाषेत लिहिले.

'अमृतानुभव' हा ग्रंथ लहान असला तरी त्यातील आशय महान आहे. त्यांनी या ग्रंथातील 'मन' या विषयावर आळंदी येथील श्रोत्यांना निरूपण सांगून या ग्रंथांचा आशयही थोडक्यात सांगितला. तसेच त्यांनी या ग्रंथलेखनामागील हेतू व ग्रंथांचे तत्त्वज्ञानही सांगितले. तसेच सदर कादंबरीमधून तत्कालीन समाजजीवन कसे होते हे दिसून येते. संत ज्ञानदेवांच्या जीवनाची व त्यांच्या वाङ्‌मयीन कर्तृत्वाची ओळख वाचकांना खऱ्या अर्थाने व्हावी ह्या हेतूनेच लेखकाने ही कादंबरी लिहिल्याचे दिसून येते. ज्ञानदेवांचे हे कार्य महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला अनेक वर्षे प्रेरणा देणारे आहे.

'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील समाजदर्शन या चौथ्या प्रकरणात तत्कालीन समाजात असलेल्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी परिस्थितींचा आढावा घेतलेला आहे.

सामाजिक जीवनाच्या चित्रणांमध्ये तत्कालीन समाजातील व्यवसाय, प्रवासाची साधने, लोकांची राहणीमान, शेती, श्रद्धा-अंधश्रद्धा, सामाजिक स्तरभेद, विवाह, निसर्ग इत्यादी घटकांचा विचार केलेला आहे. तत्कालीन समाजात अनेक लहान-मोठे व्यवसाय

केले जात असले तरी शेती हा प्रमुख व्यवसाय होता. तसेच शेती हा व्यवसाय आर्थिक जीवनाचा कणा होता. त्याकाळी शेतकऱ्यास शेतसारा दयावा लागत होता. पुरुषाप्रमाणे स्त्रियांही शेतात काम करीत होत्या. तसेच काही शेतकरी विहीरीच्या पाण्यावर बारमाही पिके घेत असत.तत्कालीन समाजातील अनेक लोक परंपरागत व्यवसाय करीत होते. तसेच त्याकाळी खेड्यांमध्ये अठरापगड जाती-जमातीचे लोक राहत होते. तत्कालीन समाजात व्यापारी, सावकारकी, कुलकर्णीपण इत्यादी व्यवसाय करणारे लोकही होते.

त्याकाळी प्रवासांच्या साधनांचा फारसा विकास झालेला नसल्याने लोक बैलगाडीने व घोडागाडीने प्रवास करत होते. तत्कालीन समाजातील लोकांचे राहणीमान अत्यंत साध्या पद्धतीचे होते. तसेच गावामध्ये सर्वसामान्य लोकांची लहान-लहान घरे होती तर काही लोकांचे मोठे वाडे होते. दररोजच्या जेवणामध्ये भाजी-भाकरी व सणाच्या दिवशी पुरण-पोळीचे जेवण केले जात असे. तसेच तत्कालीन काळातील लोकांच्या पोशाखामध्ये भिन्नता दिसून येत असली तरी लोक विशेष प्रसंगी नवीन कपडे घालत असत.

तत्कालीन समाजात विवाह व विशेष प्रसंगी लोकांना भोजन घालण्याची प्रथा होती. समाजात त्याकाळी मोठ्याप्रमाणात श्रद्धा-अंधश्रद्धा अस्तित्वात होत्या. त्याचबरोबर तत्कालीन काळात विवाह ठरविण्यापूर्वी गणगोत, शाखा, वधु-वरांची कुंडली, गुण इत्यादी बघण्याची प्रथा होती. त्याकाळी समाजात स्पृश्य-अस्पृश्यता पाळली जात होती.

मध्ययुगीन काळात अनेक धर्मपंथ उदयास आल्यामुळे महाराष्ट्रातील धार्मिक जीवनात फार मोठा बदल घडून आला. तसेच तत्कालीन लोकांच्या जीवनावर कर्मकांडाचे ओझे होते आणि त्याकाळी अनेक धार्मिक स्थळांना महत्त्व प्राप्त झाल्याने त्या ठिकाणी मोठ्या यात्रा भरत असत. त्याचप्रमाणे पंढरपूर, काशी, वाराणशी, त्र्यंबकेश्वर इत्यादी धार्मिक स्थळे प्रसिद्ध होती. त्याकाळी लोक विशेष प्रसंगी नवस व व्रते करीत होते.

तत्कालीन काळात सांस्कृतिक जीवनाचा फारसा विकास झालेला दिसत नाही. त्याकाळी सण व उत्सव मोठ्याप्रमाणात साजरे केले जात होते. त्याचबरोबर, अभंग, भजन, कीर्तन, रिंगण, गर्भानृत्ये इत्यादी कला-क्रीडा ही अस्तित्वात होत्या. तत्कालीन शिक्षण पद्धतीच विचार केल्यास विद्यार्थ्यांना गुरूगृही बारा वर्षे राहून शिक्षण घ्यावे लागत होते.

तसेच त्याकाळी धार्मिक स्थळांच्या ठिकाणीच शैक्षणिक केंद्रे असल्याने पुरुषाप्रमाणे स्त्रियांना फारसे शिक्षण घेता येत नव्हते आणि त्याकाळी स्त्रिया या पुरुषांच्या आज्ञेत असत.

त्याकाळी स्त्रिया या घरकाम व स्वयंपाक करीत. तसेच तत्कालीन समाजात अपत्यप्राप्ती नसलेल्या व विधवा स्त्रियांना फारसी प्रतिष्ठा नव्हती. त्याकाळी स्त्रियांचा विवाह हा दहा-बारा वर्षानंतर केला जात असे. तत्कालीन स्त्रिया या धार्मिक व श्रद्धाळू वृत्तीच्या होत्या. त्याकाळी गावातील सर्व व्यवहार पाटील, कुलकर्णी व चौगुले हे पाहत होते. तसेच गावामध्ये वाद व भांडण झाल्यास ते गावातील मंदिरामध्ये 'धर्मसभा' घेऊन मिटविले जात.

'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील व्यक्तिरेखा या पाचव्या प्रकरणात सदर कादंबरीतील व्यक्तिरेखांचा सूक्ष्मपणे परामर्श घेतला असून या कादंबरीतील व्यक्तिरेखा या विविध स्वरूपाच्या आहेत. तसेच या कादंबरीमध्ये शेतकरी, ब्राह्मण, पुजारी, पाटील, कुलकर्णी संतमंडळी इत्यादी अनेक स्वरूपाच्या व्यक्तिरेखा चित्रित झालेल्या आपणास पहावयास मिळतात.

सदर कादंबरीतील 'ज्ञानदेव' ही मुख्य व्यक्तिरेखा असून त्यांच्या जीवनचरित्रावरच ही कादंबरी रेखाटलेली आहे. तसेच ज्ञानदेवांचे बालपण, शिक्षण, त्यांनी मुंजीसाठी केलेले प्रयत्न, त्यांनी लिहिलेले ग्रंथ, त्यांनी घेतलेली संजीवन समाधी इत्यादी प्रसंगांचे चित्रण या कादंबरीत लेखकाने रेखाटलेले आहे. त्याचबरोबर निवृत्ती, सोपानदेव, मुक्ताई, विठ्ठलपंत, रूक्मिणी, उमाबाई, सिद्धोपंत, गोविंदपंत, नीराबाई इत्यादी व्यक्तिरेखांचे जीवनचरित्रही या कादंबरीत चित्रित झाले आहे. तसेच तत्कालीन समाजातील ब्राह्मण मंडळी, संतमेळ्यातील संत, हैबती व त्यांच्या कुटुंबातील लोक, नेवासे गावचे पाटील, सच्चिदानंदबाबा, हठयोगी चांगदेव इत्यादी गौण व्यक्तिरेखा लेखकाने अत्यंत प्रभावीपणे रेखाटलेल्या आहेत.

सदर कादंबरीत चित्रित झालेल्या सर्व व्यक्तिरेखा या महत्त्वाच्या असून त्या कादंबरीच्या कथानकाला गती प्राप्त करून देतात. तसेच या सर्व व्यक्तिरेखांमुळे ही कादंबरी अधिक उठावदार झाल्याची दिसते. त्याचबरोबर या कादंबरीत आलेल्या स्त्री व्यक्तिरेखा महत्त्वाच्या असून त्यांच्यामुळे तत्कालीन समाजातील स्त्री जीवनाचे स्वरूप कसे होते हे

समजते. सदर कादंबरीत मुख्य, गौण व स्त्री व्यक्तिरेखा चित्रित झालेल्या आहेत. त्या सर्व व्यक्तिरेखांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आहे.

यानंतर 'लोकसखा ज्ञानेश्वर कादंबरीचे अभिव्यक्ती विशेष' या सहाव्या प्रकरणामध्ये कथानक, व्यक्तिरेखन, समाजचित्रण, भाषाशैली, निवेदनशैली या घटकांचा अभ्यास केलेला आहे. सदर कादंबरी ही ज्ञानदेवांच्या जीवनचरित्रावर लिहिली असून या कादंबरीचे कथानक घटनाप्रधान आहे.

विठ्ठलपंताच्या पैठण येथील पाठशाळेतील शिक्षणापासून ते ज्ञानदेवांनी घेतलेल्या संजीवनी समाधी पर्यंतच्या प्रसंगाचे चित्रण सदर कादंबरी लेखकाने रेखाटलेले आहे. विठ्ठलपंतानी घेतलेला संन्यास, त्याने पुन्हा गृहस्थाश्रमात केलेला प्रवेश, त्यांना आळंदीच्या धर्मसभेने दिलेली देहांत प्रायश्चिताची शिक्षा, ज्ञानदेवांदि भावंडांनी मुंजीसाठी केलेले प्रयत्न, ज्ञानदेवांनी रेड्यामुखी वदविलेले वेद इत्यादी प्रसंगामुळे या कादंबरीच्या कथानकाला वेगळेच वळण प्राप्त होते. तसेच या सर्व प्रसंगामुळे या कादंबरीचे कथानक अधिक उठावदार झाल्याचे दिसते. चरित्रात्मक कादंबरीचे कथानक हे मुख्य व्यक्तिरेखेबरोबर गौण व इतर व्यक्तिरेखेवरही अवलंबून असते. त्याचबरोबर कथानकाचे बरेच यश व्यक्तिरेखनात असल्याने या कादंबरीतील व्यक्तिरेखनाचे स्वरूप लक्षात घेणे आवश्यक आहे.

सदर कादंबरीतील व्यक्तिरेखा या विविध स्वरूपाच्या असून या कादंबरीतील ज्ञानदेव ही मुख्य व्यक्तिरेखा आहे. ही कादंबरी ज्ञानदेवांच्या जीवनचरित्राशी निगडित आहे. ज्ञानदेव हे शांत स्वभावाचे व सात्त्विक वृत्तीचे असल्याने ते स्वत:ला जे पटेल ते करणारे व नंतर इतरांना सांगणारे संत होते. ज्ञानदेव हे तत्त्वज्ञ, सुधारक संत, लोकसखा व श्रेष्ठ साहित्यिक होते. तसेच या कादंबरीतील गौण व स्त्री व्यक्तिरेखाही महत्त्वाच्या आहेत. ज्ञानदेवांदि भावंडे, विठ्ठलपंत, रुक्मिणी, उमाबाई, पार्वती, नामदेव, चांगदेव, हैबती इत्यादी अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. या सर्व व्यक्तिरेखा महत्त्वाच्या असून त्या कादंबरीतील समाजजीवन समजावून घेण्यास उपयुक्त ठरलेल्या आहेत.

तत्कालीन काळातील सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी परिस्थितीचे प्रतिबिंब या कादंबरीत उमटलेले आहे. त्याकाळी समाजात अठरापगड जाती-

जमातीचे लोक राहात असून समाजात स्पृश्य-अस्पृश्यता पाळली जात होती. शेती, व्यवसाय, प्रवास, राहणीमान, श्रद्धा-अंधश्रद्धा, विवाह. निसर्ग, सण, उत्सव, कला, क्रीडा, धार्मिक स्थळे, पवित्र नद्या, ग्रामजीवनाचे चित्रण, स्त्री जीवनाचे चित्रण इत्यादीचे प्रतिबिंब प्रस्तुत कादंबरीत उमटलेले आहे. या सर्व घटकांचा सविस्तर अभ्यास प्रकरण सहामध्ये केला आहे.

प्रस्तुत कादंबरीतील समाजजीवन समजावून घेतल्यानंतर या कादंबरीतील भाषाशैलीचा विचार करणे अत्यंत आवश्यक होते. सदर कादंबरीमध्ये लेखकाने भाषा या घटकाचा कसा वापर केला आहे याचा विचार करावा लागतो. लेखकाने या कादंबरीतील निवेदनासाठी नागर भाषेचा व संवादासाठी ग्रामीण बोली भाषेचा वापर केलेला आहे. कादंबरीची भाषा प्रसंगानुरूप व व्यक्तिपरत्वे बदलात असते. उपमा, प्रतिमा, वाक्यप्रचार, प्रसंगानुरूप शिव्या, म्हणी, अभंग, ओवी, भजन, विराण्या इत्यादीचा या कादंबरीत चांगला उपयोग केलेला आहे. त्यामुळे ही कादंबरी अधिक उठावदार झाल्याची दिसते. तसेच या कादंबरीची भाषा अत्यंत सोपी, सहज व ओघवती वाटणारी आहे. निवेदनशैलीमुळे कादंबरीतील संवाद, प्रसंग, व्यक्तिरेखन इत्यादीना महत्त्व प्राप्त होते. सदर कादंबरी ही तृतीय पुरुषी निवेदनातून साकारलेली आहे. या कादंबरीच्या निवेदनात छोट्या-छोट्या वाक्यांचा वापर केल्यामुळे या कादंबरीतील निवेदन अत्यंत प्रभावी ठरल्याचे दिसते.

सातव्या प्रकरणात एकंदरीत सर्व प्रकराणांचा आढावा घेतला आहे. आनंद यादव हे प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक असून त्यांनी ग्रामीण साहित्यिक म्हणून भारतीय पातळीवर प्रसिद्धी मिळवली आहे. शेवटी परिशिष्टांमध्ये डॉ. आनंद यादव यांचा परिचय, त्यांची साहित्यसंपदा व संदर्भग्रंथ सूची देण्यात आली आहे.

अशाप्रकारे एकूण सात प्रकरणांतून 'लोकसखा ज्ञानेश्वर : एक अभ्यास' या विषयावर अभ्यास करून सदर लघुप्रबंध पूर्ण करण्यात आला आहे.

# परिशिष्ट

# परिशिष्टे

परिशिष्ट क्र. १ : डॉ. आनंद यादव यांचा परिचय

परिशिष्ट क्र. २ : डॉ. आनंद यादव यांची साहित्य संपदा

## परिशिष्ट क्र. १
## डॉ. आनंद यादव यांचा परिचय

| | | |
|---|---|---|
| संपूर्ण नांव | : | आनंद रतन यादव |
| जन्म | : | दिनांक ३० नोव्हेंबर १९३५, कागल (जि. कोल्हापूर) |
| शिक्षण | : | कागल, रत्नागिरी, कोल्हापूर, पुणे.<br>१९६१ साली मराठी-संस्कृत विषय घेऊन एम.ए.<br>(पुणे विद्यापीठ)<br>१९७४ साली 'मराठी लघुनिबंध: प्रेरणा आणि त्यांचा<br>विकास' या विषयात डॉक्टरेट मिळविली. (पुणे विद्यापीठ) |
| नोकरी | : | मराठी अध्यापन - पंढरपूर महाविद्यालय, पंढरपूर व<br>श्री शाहू मंदिर महाविद्याल, पुणे<br>प्रपाठक, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे तसेच १९९२<br>पासून प्राध्यापक आणि मराठी विभाग प्रमुख (निवृत्त) |
| पत्ता | : | ५ भूमी, कलानगर, धनकवडी,<br>पुणे-सातारा रोड, पुणे-४३. |
| मान-सन्मान | : | अध्यक्ष: चौथे दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन,<br>बेळगांव १९-२० ऑक्टोबर, १९८६.<br>अध्यक्ष: पहिले दलित-आदिवासी-ग्रामीण साहित्य<br>संमेलन, साक्री (जि. धुळे) २८-२९-३० नोव्हेंबर १९८७.<br>अध्यक्ष: चौथे मराठी जनसाहित्य संमेलन, भंडारा<br>२४, २५ नोव्हेंबर १९९० |
| अध्यक्ष (राजीनामा) | : | ८२ वे आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन,<br>महाबळेश्वर (जि. सातारा) |

## परिशिष्ट क्र. २
## डॉ. आनंद यादव यांची साहित्य संपदा

- **कविता संग्रह :**

१. हिरवे जग (१९६०)
२. मळ्याची माती (१९७८)
३. मायलेकरं (दीर्घ कविता) (१९८९)

- **कथासंग्रह :**

१. खळाळ (१९६७)
२. माळावरची मैना (१९७६)
३. घरजावाई (१९७४)
४. डवरणी (१९८२)
५. आदिताल (१९८०)
६. झाडवाटा (२०००)
७. उखडलेली झाडे (१९८६)
८. भूमिकन्या (२००१)
९. शेवटची लढाई (२००२)
१०. उगवती मने (२००३)

- **कादंबरी :**

१. गोतावळा (१९७१)
२. नटरंग (१९८०)
३. एकलकोंडा (१९८०)
४. माऊली (१९८५)
५. कलेचे कातडे (२००१)
६. लोकसखा ज्ञानेश्वर (चरित्रात्मक कादंबरी) (२००५)
७. संतसूर्य तुकाराम (चरित्रात्मक कादंबरी) (२००८)

**लिलत गद्य :**

१. मातीखालची माती (व्यक्तिचित्रे) (१९६५)
२. स्पर्श कमळे (१९७८)
३. पाणभवरे (१९८२)
४. साहित्यिकांचा गाव (२००४)

**आत्मचरित्र :**

१. झोंबी (१९८७)
२. नांगरणी (१९९०)
३. घरभिंती (१९९२)
४. काचवेल (१९९७)

**समीक्षा व वैचारिक साहित्य :**

१. ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या (१९७९)
२. ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव (१९८१)
३. मराठी साहित्य समाज आणि संस्कृती (१९८५)
४. साहित्याची निर्मिती प्रक्रिया (१९८९)
५. ललितगद्याचे तात्त्विक स्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास (१९९५)
६. आत्मचरित्र - मीमांसा (१९९७)
७. ग्रामसंस्कृती (२०००)

**वगनाट्य :**

१. रात घुंगुराची (१९७७)

**संपादने :**

१. मातीतलं मोती (निवडक मराठी ग्रामीण कथांचे संपादन व विवेचन) दीर्घ प्रस्तावना (१९७०)
२. निळे दिवस (श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या निवडक कथांचे संपादन व विवेचक)दीर्घ प्रस्तावना
३. तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा (बाबा पाटील यांच्या साहाय्याने संपादन व स्वतंत्र विवेचक) दीर्घ प्रस्तावना (१९८१)
४. बाबूराव जगताप यांच्या आठवणी (सहसंपादन)

# संदर्भ सूची

# संदर्भ सूची

अ. संदर्भ ग्रंथ सूची

ब. कोश - नियतकालिके सूची

# अ) संदर्भ ग्रंथ सूची


१. इर्लेकर, सुहासिनी : 'यादवकालीन काव्यसमीक्षा', धारा प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९७९.

२. कुलकर्णी, श्री.मा. : 'कादंबरीची रचना', उन्मेश प्रकाशन, नागपूर, आवृत्ती पहिली, १९५६.

३. कुलकर्णी, द.भि. : 'तिसऱ्यांदा रणांगण', विजय प्रकाशन, नागपूर, आवृत्ति पहिली, १९७६.

४. जान्हवी, संत : 'कादंबरी: एक वाङ्.मय प्रकार', मोघे प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती पहिली, १९७१.

५. ठाकूर, रवींद्र : आनंद यादव 'व्यक्ती आणि वाङ्.मय', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली, जुलै, १९९२.

६. देशपांडे, मा.का. : 'साहित्य साधना', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, १९६१.

७. नेमाडे, भालचंद्र : 'टीकास्वयंवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, सप्टेंबर, १९९०.

८. पगारे, हरिभाऊ : 'युग प्रवर्तक', सुधीर प्रकाशन, गणेशनगर, बोरगाव (मेघे), जि. वर्धा आवृत्ती पहिली, २००१.

९. पानसे, मु.ग. : 'यादवकालीन महाराष्ट्र', मुंबई ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई, आवृत्ती पहिली, १९६३.

१०. पेंडसे, श्री.ना. : 'एक मुक्त संवाद : उद्याच्या कादंबरीकाराशी', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९९३.

११. यादव, आनंद : 'ग्रामीण साहित्यः स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली, १९७९.

## ब) कोश व नियतकालिके सूची


१. कोतापल्ले, नागनाथ : 'प्रतिष्ठान कादंबरी समीक्षा विशेषांक', जानेवारी, १९८१.

२. जाधव, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : 'मराठी विश्वकोश, खंड-३', संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म.रा.सा.संस्कृती मंडळ, मुंबई, आवृत्ती पहिली, १९७६.

३. दीक्षित, लीला : 'स्त्री साहित्याचा मागोवा : खंड-२', साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, आवृत्ती पहिली, डिसेंबर २००२.

४. बांदिवडेकर, चंद्रकांत : 'महाराष्ट्र, साहित्य पत्रिका', ऑक्टो.-डिसें. १९७९.


891.463
MIT
T15430